IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# भारतीय सिनेमातील स्त्रीचे बदलते चित्रण आणि संस्कृत साहित्य तुलना

**डॉ. बागवान तायराशगुफ्ता इकबाल**

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*भारतीय सिनेमा*
*स्त्री*

**ABSTRACT**

स्त्रीचे स्थान हे भारतीय समाजाच्या सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक संरचनेचे महत्त्वाचे द्योतक आहे. संस्कृत साहित्य हे भारतीय संस्कृतीचे मूळस्रोत असून त्यात स्त्रीला देवी, जननी, पतिव्रता, सहधर्मचारिणीअशा विविध भूमिकांत पाहिले गेले आहे. दुसरीकडे भारतीय सिनेमा हा आधुनिक समाजाचा आरसा मानला जातो. काळानुसार त्यात स्त्रीचे चित्रण आदर्श, सहनशील भूमिकेपासून सशक्त, स्वायत्त व निर्णयक्षम व्यक्तिमत्त्वापर्यंत विकसित झालेले दिसते.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Bagwan, T. I. (2025). *भारतीय सिनेमातील स्त्रीचे बदलते चित्रण आणि संस्कृत साहित्य तुलना.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **818–826**.

**प्रस्तावना**

स्त्रीचे स्थान हे भारतीय समाजाच्या सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक संरचनेचे महत्त्वाचे द्योतक आहे. संस्कृत साहित्य हे भारतीय संस्कृतीचे मूळस्रोत असून त्यात स्त्रीला देवी, जननी, पतिव्रता, सहधर्मचारिणीअशा विविध भूमिकांत पाहिले गेले आहे.

दुसरीकडे भारतीय सिनेमा हा आधुनिक समाजाचा आरसा मानला जातो. काळानुसार त्यात स्त्रीचे चित्रण आदर्श, सहनशील भूमिकेपासून सशक्त, स्वायत्त व निर्णयक्षम व्यक्तिमत्त्वापर्यंत विकसित झालेले दिसते.

**संशोधनाची उद्दिष्टे-**

१)संस्कृत साहित्यातील स्त्रीचे स्थान स्पष्ट करणे.
२)भारतीय सिनेमातील स्त्रीप्रतिमेतील बदलांचा अभ्यास करणे.
३)दोन्ही माध्यमांतील स्त्रीप्रतिमेतील साम्य व भेद दाखवणे.
४)सामाजिक व स्त्रीवादी दृष्टिकोनातून विश्लेषण करणे.
५)संस्कृत साहित्यातील 'आदर्श नायिका' आणि आजच्या सिनेमातील 'स्वतंत्र नारी' यांच्यातील दुवा शोधणे हा या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**संशोधन पद्धती-**

या शोधनिबंधासाठी तुलनात्मक व समीक्षात्मक पद्धत या संशोधन पद्धतींचा वापर केला आहे.

**मर्यादा-**

संस्कृत साहित्याचे दालन फार विस्तृत असल्यामुळे विस्तार भयास्तव संस्कृतच्या काही निवडक ग्रंथांचाच विचार शोधनिबंधासाठी केला आहे. तसेच चित्रपटांची संख्या देखील खूप असल्याने काही निवडक हिन्दी चित्रपटांचा उल्लेख प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केला आहे. संस्कृत साहित्य हे भारतीय संस्कृतीचे मूल स्रोत आहे. या साहित्यात स्त्रीला केवळ सामाजिक घटक न मानता मूल्य, शक्ती, बुद्धी व संस्कार यांचे केंद्र मानले आहे. विविध ग्रंथांत स्त्रीचे स्थान भिन्न भूमिकांमध्ये अधोरेखित होते.

**वेदकालीन स्त्रीचे स्थान**

वेदकालीन समाजात स्त्रीला शिक्षणाचा अधिकार होता. ती उपनयन संस्कार करून वेदाध्ययन करत असे. ऋग्वेदात स्त्री ऋषिकांनी रचलेली सूक्ते आढळतात. ऋग्वेदात घोषा, लोपामुद्रा, अपाला, विश्ववारा, रोमशा इत्यादी स्त्री ऋषिकांचा उल्लेख आहे. या स्त्रिया वैदिक मंत्र रचना करणाऱ्या होत्या. ऋग्वेदात सुमारे २७ ऋषिकांचे संदर्भ मिळतात.वेदांमध्ये यज्ञकर्मात पत्नीचा सहभाग अनिवार्य मानला आहे. पत्नीविना यज्ञ अपूर्ण मानला जात असे.

गार्गी ही महान तत्त्वचिंतक होती. बृहदारण्यक उपनिषदात राजा जनकाच्या दरबारात गार्गीने याज्ञवल्क्य ऋषींना विश्वाच्या उत्पत्तीबाबत अत्यंत कठीण प्रश्न विचारले होते. गार्गीची विद्वत्ता पाहून तिला ‘ब्रह्मवादिनी’ ही पदवी देण्यात आली. यावरून तिची तात्त्विक प्रगल्भता दिसून येते. मैत्रेयी आत्मज्ञानाची साधक होती. तिने संपत्तीपेक्षा आत्मज्ञान श्रेष्ठ असल्याचे स्पष्ट केले. याज्ञवल्क्य ऋषींची पत्नी मैत्रेयी हिने संपत्तीऐवजी ‘अमृतत्वाचा’ (आत्मज्ञानाचा) मार्ग निवडला. तिने विचारलेला प्रश्न आजही प्रसिद्ध आहे.

“येनाहं नामृतास्यां किं महं तेन कुर्याम् ?”(ज्याने मला अमरत्व मिळणार नाही, त्या संपत्तीचे मी काय करू?) (बृहदारण्यक उपनिषद २.४)

स्त्री : शक्ती व ज्ञानाचे प्रतीक

वेद व उपनिषदांमध्ये स्त्रीला शक्ती, प्रज्ञा व सर्जनशीलतेचे प्रतीक मानले आहे. सरस्वती (ज्ञान), उषा (प्रकाश), अदिती (अनंतता) या देवता स्त्री स्वरूपात वर्णिल्या आहेत.

**रामायणातील स्त्रीप्रतिमा**

आदिकाव्य रामायण हे भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. रामायणातील कथानक हे प्रामुख्याने रामाच्या जीवनावर आधारित असले, तरी या महाकाव्याला गती देण्याचे आणि वळण देण्याचे काम 'स्त्रीपात्रांनी' केले आहे. सीतेचे सोशिकपण, कैकयीची महत्त्वाकांक्षा, ऊर्मिलेचा त्याग आणि शबरीची भक्ती अशा विविध छटांतून रामायणातील स्त्रीप्रतिमा साकारली आहे.

१) सीता : सहनशीलता, पतिव्रत्य आणि स्वाभिमानाचे प्रतीक
२) कैकयी : महत्त्वाकांक्षी, स्पष्टवक्ती आणि दृढनिश्चयी
३) ऊर्मिला : त्याग, उपेक्षित
४) शबरी : भक्ती प्रतिमा
५) अहिल्या : सामाजिक पुनर्वसन आणि मुक्तीची प्रतिमा
६) मंदोदरी : विवेक आणि बुद्धिमत्ता

याशिवाय कौसल्या आणि सुमित्रा यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू तत्कालीन स्त्रियांच्या प्रतिमेवर प्रकाश टाकतात.

**महाभारतातील स्त्रीप्रतिमा**

"यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:" या उक्तीपासून ते स्त्रियांच्या संघर्षापर्यंत विविध छटा आढळतात. महाभारतातील स्त्री ही अबला नसून ती बुद्धिमान, ध्येयवादी आणि प्रसंगी अत्यंत कठोर निर्णय घेणारी आहे.

**महाभारतातील प्रमुख स्त्रीप्रतिमेचे पैलू :**

१) गांधारी : त्याग आणि धैर्याची मूर्ती
२) कुंती : राजकीय चातुर्य आणि स्वाभिमानाचे प्रतीक
३) द्रौपदी : अस्तित्व आणि अन्यायाविरुद्धचा आवाजाचे प्रतीक
४) अंबा (शिखंडी) : प्रतिशोध आणि जिद्दीचे प्रतीक

आपल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी भीष्मांच्या पतनाचे कारण बनणारी अंबा (शिखंडी) ही स्त्रीच्या जिद्दीचे टोकाचे उदाहरण आहे.

महाभारतातील स्त्री ही केवळ घर सांभाळणारी नसून ती राजकारण, धर्म आणि नीतीशास्त्र यात पारंगत होती. मात्र, त्याचवेळी तिला 'द्यूत' (जुगार) मध्ये पणाला लावणे किंवा तिच्यावर होणारे अन्याय हे तत्कालीन समाजातील स्त्रीच्या दुय्यम स्थानाचे देखील दर्शन घडवतात. महाभारतातील स्त्रीप्रतिमा ही अत्यंत बहुआयामी आहे. ती कधी कोमल आहे, तर कधी संहारक. आजच्या आधुनिक काळातही महाभारतातील स्त्रियांचे संघर्ष आणि त्यांचे निर्णय तितकेच सुसंगत वाटतात. त्या केवळ पुरुषांच्या सावल्या नसून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व जपणारी व्यक्तिमत्त्वे आहेत.

**संस्कृत पंच महाकाव्यांतील स्त्री प्रतिमा**

१. रघुवंशम् - इंदुमती पत्नी सल्लागार, मैत्रीण आणि पुरुषाची बरोबरीची जोडीदार आणि मार्गदर्शक म्हणून चित्रित केली आहे.

२. कुमारसंभवम्- पार्वतीची तपश्चर्या स्त्रीच्या दृढ निश्चयाचे आणि केवळ बाह्य सौंदर्यावर अवलंबून न राहत नाही, आत्मिक बळावरध्येय गाठण्याचे प्रतीक आहे. ३. किरातार्जुनीयम्- द्रौपदीचा स्वाभिमान येथे द्रौपदी ही केवळ एक पिडीत स्त्री नसून ती आपल्या पतीला (राजाला) क्षात्रधर्माची आणि राजकारणाची आठवण करून देणारी एक विद्रोही आणि 'तेजस्विनी' म्हणून समोर येते.

४. नैषधीयचरितम् -दमयंतीचे चातुर्य, 'प्रगल्भ बुद्धिमत्ता' आणि 'निर्णयक्षमता' असलेली स्त्री आहे.

५. शिशुपालवधम्-माघ कवीने स्त्रीच्या शृंगारिक आणि सौंदर्यात्मक पैलूवर अधिक भर दिला असून ती आनंदाचे

उगम स्थान असल्याचे दर्शवले आहे.

संस्कृत पंच महाकाव्यांतील स्त्री ही केवळ पुरुषाची सावली नाही. ती कठीण प्रसंगात सल्ला देते , कलेत साथ देते आणि प्रसंगी पुरुषाला युद्धासाठी प्रवृत्त करते. महाकाव्यांतील स्त्री प्रतिमा 'सौंदर्य' आणि 'शक्ती' यांचा अपूर्व संगम आहे.

**संस्कृत नाटकातील स्त्री प्रतिमा**

' भिन्न रुचेर्जनस्य बहुधापि एकं समाराधनम् नाम नाटयम्|' असे कालिदासाने म्हटले आहे.

संस्कृत नाटकांतील स्त्री ही केवळ अभिनयाचे पात्र नसून ती तत्कालीन समाजाचा आरसा आहे. भास, कालिदास, भवभूती आणि शूद्रक यांसारख्या नाटककारांनी स्त्रीच्या विविध रूपांचे – जसे की प्रेयसी, स्वाभिमानी पत्नी, विदूषी आणि गणिका – अतिशय सूक्ष्म चित्रण केले आहे.

प्रमुख नाटकातील स्त्री प्रतिमा आणि विश्लेषण

'स्वप्नवासवदत्तम्' -वासवदत्ता – 'उदात्त आणि सोशीक' पत्नी.

अभिज्ञान शाकुंतलम्- शकुंतला – 'सहनशीलपण स्वाभिमानी अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी' स्त्री.

मृच्छकटिकम्- वसंतसेना – 'स्वतंत्र आणि गुणग्राही' स्त्री.

उत्तररामचरितम्-सीता – 'करुणा आणि क्षमेची' मूर्ती. 'सोशीकतेची' परिसीमा

'मालविकाग्निमित्रम्' - मालविका – कला सक्त आणि सुशिक्षित.

५. वेणीसंहार- सूड घेणारी क्षत्रिय स्त्री.

**पुराणांतील स्त्री प्रतिमा**

पुराणेही भारतीय संस्कृतीचे ज्ञान कोश मानली जातात. वेदानंतरच्या काळात समाजव्यवस्थेला दिशा देण्याचे काम पुराणांनी केले.पुराणांतील स्त्री ही केवळ कुटुंबापुरती मर्यादित नसून ती सृष्टीची उत्पत्ती, स्थिती आणि लय करणारी 'आद्यशक्ती' आहे.पुराणांत स्त्रीच्या तीन दैवी स्वरूप (देवी),कौटुंबिक स्वरूप (माता-पत्नी) तपस्विनी स्वरूप प्रमुख छटा दिसतात. पुराणांतील स्त्रीची सामाजिक स्थिती पुराणांत स्त्रीच्या शिक्षणाबद्दल आणि तिच्या अधिकारांबद्दल संमिश्र विचार दिसतात:

पुराणांतील स्त्री प्रतिमा ही 'कोमल' आणि 'कठोर' अशा दोन्ही टोकांवर उभी आहे. ती अन्नपूर्णा म्हणून घराचा सांभाळ करते आणि प्रसंगी चंडिका बनून संकटाचे निवारण करते. पुराणांनी स्त्रीला 'प्रकृती' मानले आहे, जिच्याशिवाय 'पुरुष' (शिव) अपूर्ण आहे.

**धर्मशास्त्रांतील स्त्री प्रतिमा**

धर्मशास्त्रांतील स्त्री ही 'संरक्षण आणि आदर' या दोन्ही सूत्रांभोवती फिरते. तिचे स्वातंत्र्य मर्यादित झाले असले, तरी माता आणि गृहलक्ष्मी म्हणून तिला दिलेले स्थान सर्वोच्च आहे.

"यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:| मनुस्मृती (अध्याय ३, श्लोक ५६)

हे धर्मशास्त्रातील स्त्री सन्मानाचे सर्वात प्रसिद्ध वचन आहे. स्त्री ही कुटुंबाच्या आणि समाजाच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक प्रगतीचा आधार मानली गेली आहे.

पितारक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने। मनुस्मृती (अध्याय ९, श्लोक ३) हे धर्मशास्त्रातील वचन स्त्रीचे संरक्षणात्मक परावलंबित्व स्पष्ट करते.धर्मशास्त्रे पितृसत्ताक असली तरी मातेला सर्वोच्च स्थान मानले आहे. याज्ञवल्क्य स्मृतीतील व्यवहाराध्यायात स्त्रीला पतीच्या संपत्तीत वाट नसलातरी तिच्या स्वतःच्या 'स्त्रीधना'वर तिचा पूर्ण अधिकार सांगितला आहे.

संस्कृत साहित्याच्या प्रवास अभ्यासताना असे लक्षात येते की:वैदिक काळात: स्त्री 'मंत्रद्रष्टा' (ऋषी) होती (उदा. घोषा, अपाला).काव्य काळात: ती 'आदर्श गृहिणी' आणि 'सौंदर्याची मूर्ती' झाली.स्तोत्र काळात: तिचे पूर्णतः 'दैवतीकरण' होऊन ती विश्वाची माता बनली.

**भारतीय सिनेमातील स्त्रीचे बदलते चित्रण**

आधुनिक सिनेमा स्त्रीचे चित्रण विविध स्वरूपांत करतो.कुठे ती ग्लॅमरचे साधन ठरते, तर कुठे ती शक्त, स्वावलंबी व्यक्तिमत्व म्हणून समोर येते.त्यामुळे आधुनिक सिनेमातील स्त्री प्रतिमा द्विधा विरोधाभासी स्वरूपाची आहे.त्यामागे शिक्षण आणि सक्षमीकरण, स्त्री दिग्दर्शकांचा उदय आशी बदलाची अनेक कारणे दिसतात.

**ग्लॅमर प्रधान वस्तूकरण झालेली स्त्री प्रतिमा**

ग्रँड मस्ती, रेस , हाऊस फुल्ल मालिका यासारख्या चित्रपटांमध्ये तसेच दबंग आणि इतरही आयटम सॉंग्स मध्ये स्त्री व्यक्ती न राहता विक्री योग्य वस्तू म्हणून सादर होते. बहुतांशी चित्रपटात कथानकाला फारसा प्रभाव न टाकणारी, प्रामुख्याने नृत्य, कपडे, व देह सौंदर्य यांचे प्रदर्शन करणारी तिची प्रतिमा प्रेक्षकांच्या समोर प्रदर्शित केली जाते.

**नायक केंद्री (दुय्यम) स्त्री प्रतिमा**

कबीर सिंग, तेरे नाम, वॉन्टेड यासारख्या चित्रपटांमध्ये स्त्री पात्र नायकाच्या भावविश्वापुरते मर्यादित दिसते. स्त्रीचे अस्तित्व नायकाभोवती फिरते.

**पीडित व अत्याचारग्रस्त स्त्री प्रतिमा**

पिंक, मॉम, दामिनी यासारखे चित्रपट स्त्रीवरील अन्याय अधोरेखित करणारे, सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब दर्शविणारे, न्याय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरतात.

**सशक्त, स्वावलंबी व निर्णयक्षम स्त्री प्रतिमा-**

स्त्री कथानक केंद्रबिंदू असलेल्या काही चित्रपटांमध्ये स्वतःचे निर्णय घेणारी, अन्यायाविरुद्ध उभी राहणारी असते.उदा. क्वीन चित्रपटामध्ये आत्मशोध व स्वातंत्र्याची, थप्पडमध्ये आत्मसन्मानाची, राजी मध्ये राष्ट्रनिष्ठा व बुद्धिमत्तायाची, गंगुबाई कठीयावाडी मध्ये नेतृत्व व आत्मविश्वासाची आशा नायिका भोवती कथानक स्त्रीयांच्या विविध प्रतिमा प्रदर्शित केल्या आहेत.

**व्यावसायिक व करिअर प्रधान स्त्री प्रतिमा**

काही चित्रपटांमध्ये स्त्री स्वतंत्र ओळख निर्माण करते. स्त्रीचे व्यावसायिक अस्तित्व, आत्मविश्वास व संघर्ष सामाजिक बंधनांवर मात, आशा स्त्रीयांच्या विविध प्रतिमा प्रदर्शित केल्या आहेत. उदा. – मेरी कॉम – क्रीडा क्षेत्रातील यशस्वी स्त्री, गुंजन सक्सेना – लष्करी सेवेत स्त्री, इंग्लिश विंग्लिश – आत्मसन्मान जपणारी व शिक्षणाला प्राधान्य देणारी गृहिणी.

**आधुनिक चित्रपटातील स्त्री प्रतिमेचे सामाजिक परिणाम**

चित्रपट म्हणजे सामाजिक परिणाम करणारे प्रभावी माध्यम आहे.चित्रपटांमध्ये दाखविल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या प्रतिमेवरून स्त्री विषयक समाज दृष्टि घडते.चित्रपटांचा सर्वात जास्त प्रभाव तरुण पिढीवर पडतो.तसेच चित्रपटामध्ये एका बाजूला व्यावसायिक व वस्तूकरण, दुसऱ्या बाजूला शक्तीकरण व आत्मसन्मान प्रदर्शित केल्यामुळे स्त्री प्रतिमेबाबत प्रेक्षकांच्या मनात सशक्तीकरण व वस्तूकरण असामानसिक संघर्ष सुरु होतो.

आधुनिक चित्रपटांतील स्त्री प्रतिमेचा समाजावर खोल व व्यापक परिणाम होत आहे. या प्रतिमांमुळे स्त्री सक्षमीकरण, शिक्षण, आत्मनिर्भरता व सामाजिक जाणीव यांना चालना मिळते. तथापि, वास्तववादी व संतुलित स्त्री प्रतिमा सादरकरणे ही चित्रपट सृष्टीची सामाजिक जबाबदारी आहे.

**नायिका भोवती कथानक फिरणारी काही संस्कृत नाटके:**

अभिज्ञान शाकुंतलम् - शकुंतला कथानकाचा भावनिक केंद्रबिंदू असल्याने राजदरबारात आत्मसन्मानाने आपली ओळख सिद्ध करणारी नायिका प्रेक्षकांसमोर उभी राहते.

तसेच मालविकाग्निमित्रम् ,मृच्छकटिकम् , रत्नावली, प्रियदर्शिका उत्तमरामचरितम् स्वप्नवासवदत्ता या सर्व ठिकाणी नायिका भोवती फिरणारी कथानक दिसते.

**नायक केंद्री (नायककेंद्री) कथानके:**

नायक प्रधान नाटकामध्ये कथानकाचे केंद्रबिंदू पुरुष नायक असल्यामुळे त्यांचे राजकीय, नैतिक व वीर गुणांचे चित्रण नाटककार घडवितो.नायकाच्या निर्णयांवर कथानकाची दिशा ठरलेली दिसते.उदा. रत्नावली- कथानक राजा उदयनच्या प्रेम-पराक्रमाभोवती फिरते. याशिवाय नागानंदम्, मालविकाग्निमित्रम्, प्रतिज्ञा यौगंधरायणम्, अभिषेक नाटकम्, स्वप्नवासवदत्ता, दूतवाक्यम् इत्यादी.

**करिअर प्रधान (स्वावलंबी / कर्तृत्ववान) नायिका असलेली संस्कृत नाटके**

प्राचीन काळात "करिअर" म्हणजे स्वतःची ओळख, कला, बुद्धिमत्ता, निर्णयक्षमता व सामाजिक भूमिकांवर उभी असलेली नायिका म्हणजेच करिअर प्रधान नायिका मानली जाते.

आर्थिक / बौद्धिक / कलात्मक स्वावलंबन,पुरुषावर संपूर्ण अवलंबित्व नाही . निर्णयक्षमता व आत्मसन्मान,सामाजिक वास्तवाची जाणीव असलेली दिसते. संस्कृत नाटकांतील करिअर प्रधान नायिका आधुनिक अर्थाने नोकरी करणारी नसली, तरी स्वतःच्या कर्तृत्व, कला, बुद्धिमत्ता व निर्णयक्षमतेवर उभी असलेली स्वतंत्र स्त्री म्हणून ती निश्चितच आधुनिक करिअर प्रधान स्त्रीची पूर्वरूपे मानली जाते.

मृच्छकटिकम्- स्वतःच्या कर्तृत्वावर जगणारी गणिका, आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी, प्रेमातही स्वतंत्र निर्णय घेणारी,समाजातील अन्यायाविरुद्ध ठाम भूमिका असलेली, संस्कृत नाट्य परंपरेतील सर्वात ठळक करिअर प्रधान नायिका म्हणजे वसंतसेना.व्यावसायिक ओळख असलेली स्त्री गणिका असूनही आत्मसन्मानवान. पुरुषावर अवलंबून नसलेली, स्वतंत्र अस्तित्व असलेली. भासाने देखील चारुदत्तम् नाटकात तिची प्रतिमा रंगवली आहे. याशिवाय मालविकाग्निमित्रम्, रत्नावली इत्यादी.

**करिअर प्रधान नायिकांची वैशिष्ट्ये (संस्कृत नाटकांत)**

**स्त्री देहाचे शृंगारिक वर्णन**

अभिज्ञानशाकुंतलम् -शकुंतलेचे सौंदर्य, नेत्र, ओठ, केश, अंग सौष्ठव यांचे सूचक वर्णन. शकुंतलेच्या सौंदर्यावरून निसर्गही आकर्षित असल्याचे उल्लेख.विक्रमोर्वशीयम्-उर्वशीचे दैवी, कामनात्मक सौंदर्य, देह सौष्ठव, गती, दृष्टि यांचे काव्यमय वर्णन. मृच्छकटिकम्-वसंतसेनेचे सौंदर्य नागरी, लौकिक व कामप्रधान असून स्त्री देहाचे आकर्षण, अलंकार, गती यांचे वर्णन दिसते.मालविकाग्निमित्रम् -मालविकेचे सौंदर्य नृत्य, लय, अंगविक्षेप यांतून, देहाचे सौंदर्य कला माध्यमातून वर्णन केल्याचे दिसते.कुमारसंभवम् -पार्वतीचे सौंदर्य, यौवन, अंग सौष्ठव, तपश्चर्यासह शृंगाराचे सुंदर संतुलन.

तसेच रघुवंशम् , गीतगोविन्दम्, अमरुशतकम्, शृंगारशतकम् आशा संस्कृत साहित्यात शृंगारिक वर्णन हे अश्लीलता टाळून सूचकता दर्शवितात. त्यामध्ये देह + भावना + निसर्ग यांचा संगम दिसतो.स्त्री देह म्हणजे सौंदर्य, आकर्षण, रसोत्पत्तीचे साधन असल्याचे दिसते संस्कृत नाटके व काव्येतील स्त्री देहाचे शृंगारिक वर्णन हे फक्त शारीरिक नसून, तर सौंदर्य, भावना व काव्य रस यांचे सुसंस्कृत आविष्कार. ते कलात्मक, संयत व रसप्रधान असून भारतीय सौंदर्यशास्त्राची उच्च परंपरा दर्शवते.

**शक्ती व देवी रूप स्त्रीचे गौरवकरणारे हिंदी चित्रपट**

मदर इंडिया - शक्ती, संरक्षण व न्यायाचे रूप .स्त्री ही अबला नसून संहारक शक्तीही आहे.देवी-मातेच्या स्वरूपात स्त्रीचे गौरव गान,दुर्गा देवी संबंधित कथानके, विविध चित्रपट उदा. जय संतोषी माँ. याशिवाय दामिनी- अन्यायाविरुद्ध एकटी उभी राहणारी. कहानी- दुर्गापूजेच्या पार्श्वभूमीवर पतीच्या मारेकऱ्याचा वध करणारी आधुनिक दुर्गा आहे .मर्दानी- देवीसारखी संरक्षणकर्ती स्त्री पोलिस अधिकारी.नीरजा- त्याग व धैर्याची मूर्ती, बलिदानी देवी दर्शवली आहे.

चित्रपटांमधील देवी रूप स्त्री म्हणजे अन्यायाविरुद्ध उभी राहणारी,करुणा + कठोरता यांचा समतोल राखणारी,त्याग, मातृत्व, न्याय, संरक्षण यांचे प्रतीक असलेली,परंपरा व आधुनिकतेचा संगम आहे.हिंदी

चित्रपटांमध्ये स्त्रीला देवी व शक्तीच्या रूपात मांडण्याची परंपरा मदर इंडिया पासून कहानी पर्यंत सातत्याने दिसते.ही स्त्री केवळ पूजनीय नसेल, तर अन्याय नाश करणारी, न्याय प्रस्थापित करणारी व समाज रक्षण करणारी शक्ती म्हणून उभी राहते.

**पीडित व अत्याचारग्रस्त स्त्रीवर आधारित संस्कृत नाटके**

अभिज्ञान शाकुंतलम् - गर्भवती अवस्थेत राजसभेत अपमानित, सामाजिक व मानसिक अत्याचार सहन करणारी, मौन धरणारी, सहनशीलपण अंतर्बळ असलेली पीडित स्त्री शकुंतला आहे. उत्तमरामचरितम् - लोकापवादामुळे वनवास, पतीकडूनच त्याग धर्माच्या नावाखाली झालेल्या स्त्रीवरचा अन्याय सहन करणारी, स्वप्नवासवदत्ता / प्रतिज्ञायौगंधरायणम् - राजकारणाची बळी ठरलेली स्त्री वासवदत्तेच्या भूमिकेत या दोन्ही नाटकात दिसते. मृच्छकटिकम् -गणिका असूनही शत्रू-द्वेषामुळे खोटाखून आरोपाच्या अन्यायाविरुद्ध उभी राहणारी पीडित आणि सामाजिक दृष्ट्या असुरक्षित स्त्री.सभेत अपमान, पतींच्या मौनामुळे स्त्री देह व सन्मानावर अत्याचार सहन करणारी द्रौपदी अनेक नाटके मध्ये दिसते, उदा. दूतवाक्यम्

**मृच्छकटिकम् (संस्कृत नाटक) आणि ‘‘उत्सव’ (हिंदी सिनेमा) यांतील स्त्री प्रतिमेची तुलना :**

शूद्रक रचित ‘मृच्छकटिकम्’ हे संस्कृत नाटक सामाजिक वास्तव, मानवी संवेदना आणि स्त्री स्वातंत्र्याचे समर्थ चित्रण करणारे महत्त्वपूर्ण नाटक मानले जाते.यानाटकावर आधारित गिरीश कर्नाड यांनी १९८४ मध्ये ‘उत्सव’ हा हिंदी चित्रपट दिग्दर्शित केला.

या दोन्हीकलाकृतींमधील 'स्त्री प्रतिमा' आणि विशेषतः 'वसंतसेना' पात्राची मांडणीही काळ आणि माध्यमाच्या फरकामुळे भिन्न स्वरूपाची दिसते.

वसंतसेना: नाटकातील 'कुलांगना' विरुद्ध चित्रपटातील 'ग्लॅमरस' प्रतिमा.

नाटकात: प्रमुख स्त्री व्यक्तीरेखा, गणिका असूनही आत्मसन्मानी, सामाजिक बंधनांतही ‘स्वतंत्र व्यक्तिमत्त्व’. प्रेमात प्रामाणिक, निर्णयक्षम, धैर्यशील, चारुदत्तावर प्रेमासाठी सामाजिक जोखीम स्वीकारणारी.सामाजिक वास्तवाशी संघर्ष करणारी, वैचारिक व नैतिक बळ असलेली.

चित्रपटात: अधिक ग्लॅमरप्रधान, सौंदर्य व कामुकतेवर भर देणारी, भावनिक संघर्ष अधोरेखित करणारी.सामाजिक बंडखोरी मर्यादित, दृश्यात्मक प्रतिमा.नृत्य, देहसौंदर्यांवर विशेष भर, स्त्रीचे अंतर्मन तुलनेने दुर्लक्षित.साहित्यिक गांभीर्य अंशतः कमकुवत.

संस्कृत नाटकातील वसंतसेना subject, हिंदी सिनेमात object of gaze.

साहित्य स्त्रीला विचार देते, सिनेमा दृश्यरूप देते.गणिकेच्या माध्यमातून समाजातील दांभिकतेवर टीका.नैतिक व भावनिक स्वातंत्र्य अधोरेखित.‘मृच्छकटिकम्’ यास संस्कृत नाटकातील स्त्री प्रतिमा आश्चर्यकारकरीत्या आधुनिक, स्वायत्त व शक्तिशाली आहे.

हिंदी सिनेमा स्त्रीचे रूप अधिक सौंदर्यकेंद्रित, मनोरंजनप्रधान बनवतो. संस्कृत साहित्य स्त्रीला ‘व्यक्ती’, तर सिनेमा ‘प्रतिमा’ म्हणून मांडतो.

**अभिज्ञान शाकुंतलम् (संस्कृत नाटक) आणि ‘शाकुंतलम्’ (हिंदी सिनेमा) यांतील स्त्री प्रतिमेची तुलना**

महाकवी कालिदास यांचे अभिज्ञान शाकुंतलम् हे संस्कृत नाटक भारतीय नाट्य परंपरेतील अजरामर कलाकृती.स्त्री कोमलता, नैतिकता, सहनशीलता आणि अंतर्बळाचे प्रतीक म्हणून द्र्श्विले आहे .तर हिंदी चित्रपटात शकुंतलेच्या स्त्री प्रतिमेत बदल दिसतो.

नाटकात आदर्श व कोमल स्त्री,निसर्गाशी एकरूप आश्रम कन्या,लज्जाशील, प्रेमळ व करुणामयी,प्रेमात प्रामाणिक, मर्यादाशील, कोमलपण नैतिक दृष्ट्या सशक्त,अन्याय सहन करणारी, आत्मसन्मान जपणारी, भावनिक संघर्षात गुंतलेली शकुंतला नाटकात प्रकट होते.

चित्रपटात अधिक सौंदर्यप्रधान व नृत्यप्रधान, प्रेमकथेवर भर, भावनांचे बाह्य प्रदर्शन, कॅमेऱ्याचा प्रभाव स्त्री प्रतिमा

आकर्षक बनवतो.स्त्री स्वातंत्र्याचे मर्यादित दर्शन, सहनशीलता अधिक उठावदार,साहित्यिक सूक्ष्मता तुलनेने कमी पुरुष केंद्रित कथानकामुळे अंतर्बळ व गांभीर्य कमी दिसते.

'अभिज्ञान शाकुंतलम्' -स्त्री सौंदर्य व प्रेमाचे काव्य तर शाकुंतलम्' चित्रपट -दृश्यकला, कालिदासाची शकुंतला आदर्श तर सिनेमा आकर्षक व संघर्षात्मक आहे. यावरून असे लक्षात येते की,काळ बदलला तरी महत्व कमी झालेले नाही, रूप व्यावसायिक व सशक्त झाले.

**वाल्मीकि रामायण आणि हिंदी सिनेमा रावण यांतील सीतेच्या प्रतिमेची तुलना**

भारतीय सांस्कृतिक परंपरेत सीता ही आदर्श स्त्री प्रतिमेचे प्रतीक मानली जाते.वाल्मीकि रचित रामायण मध्ये सीतेचे चित्रण सहनशीलता, पतिव्रता धर्म, नैतिक बळ आणि आत्मगौरव यांच्या आधारे झालेले दिसते.२१व्या शतकातील हिंदी सिनेमा मणिरत्नम दिग्दर्शित रावण मात्र रामायण कथेला आधुनिक सामाजिक-राजकीय संदर्भात पुनर्व्याख्यायित करतो. या चित्रपटातील सीतेची समांतर प्रतिमा रागिणी या पात्रामधून उभी राहते.

वाल्मीकि रामायणातील सीता पतिव्रता धर्माचे प्रतीक, वनवासात पतीसह कष्ट सहन करणारी,नैतिक मूल्यांशी निष्ठावान, स्वतःला रामाशी अभिन्न मानते.अग्निपरीक्षेच्या प्रसंगात सीता मौन राखून अन्याय सहन करते.स्वतःच्या शुद्धतेबद्दल आत्मविश्वास दाखवते.दुर्बल नसून नैतिक दृष्ट्या सशक्त असून प्रामुख्याने पुरुषप्रधान व्यवस्थेत, सीतेचा आवाज नैतिक आहे; राजकीय नाही स्त्री प्रतिमा आदर्श, पण स्वायत्तता मर्यादित दिसते .

हिंदी सिनेमा रावण मधील रागिणी शिक्षित, आत्मनिर्भर, पोलिस अधिकाऱ्याची पत्नी. अपहरणानंतरही मानसिक दृष्ट्या खंबीर ,रावण (वीरैया) याच्याशी संवाद साधणारी स्त्री केवळ सहनशील नसून संवादक्षम व निर्णयक्षम,आधुनिक सीतेचे रूप म्हणजे रागिणी, ती आपली भूमिका स्वतः ठरवते,भावनिकदृष्ट्या अस्थिर न होता परिस्थितीचे भान ठेवते. पुरुष पात्रांवर नैतिक प्रभाव टाकणारी,आधुनिक स्त्रीवादी दृष्टिकोनाशी सुसंगत दिसते .

वाल्मीकि सीता -आदर्श नारी,रावण मधील रागिणी - स्वतंत्र विचारांची स्त्री,
प्राचीन साहित्यात स्त्रीचा त्याग गौरविला जातो.आधुनिक सिनेमात स्त्रीचे स्त्रीत्व अधोरेखित
वाल्मीकि रामायणातील सीता ही भारतीय संस्कृतीतील आदर्श स्त्री प्रतिमेचे मूर्त रूप आहे,

---

हिंदी सिनेमा रावण मधील स्त्री प्रतिमा ही आधुनिक, स्वायत्त व निर्णयक्षम स्त्रीचे प्रतिनिधित्व करते.दोन्ही प्रतिमा त्यांच्या काळाच्या सामाजिक मूल्यांचे प्रतिबिंब आहेत. सीतेची प्रतिमा काळानुसार बदलत असली तरी तिचे नैतिक बळ दोन्ही माध्यमांत कायम आहे.

**निष्कर्ष**

---

या शोधनिबंधाच्या अभ्यासातून असे स्पष्ट होते की संस्कृत साहित्य आणि भारतीय सिनेमा या दोन्ही माध्यमांत स्त्रीप्रतिमा सतत परिवर्तनशील राहिलेली आहे, मात्र त्या परिवर्तनाचा स्वरूप, दिशा व हेतू वेगवेगळे आहेत.

संस्कृत साहित्यामध्ये स्त्रीला केवळ भावनिक किंवा सौंदर्यप्रधान न मानता बुद्धी, विवेक, शक्ती, निर्णयक्षमता व नैतिक मूल्यांची वाहक म्हणून पाहिले गेले आहे. वैदिक काळातील ऋषिका, उपनिषदांतील ब्रह्मवादिनी, महाकाव्यांतील स्वाभिमानी स्त्रिया, नाटकांतील स्वावलंबी नायिका आणि पुराणांतील देवीरूप स्त्री या सर्व प्रतिमा स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाची साक्ष देतात.

दुसरीकडे, भारतीय सिनेमा हा आधुनिक समाजाचा आरसा असला तरी त्यामध्ये स्त्रीचे चित्रण द्विधा स्वरूपाचे आढळते. एका बाजूला स्त्रीचे वस्तूकरण, ग्लॅमरायझेशन व नायककेंद्री दुय्यमीकरण, तर दुसऱ्या बाजूला सशक्त, स्वाभिमानी, निर्णयक्षम आणि अन्यायाविरुद्ध उभी राहणारी स्त्री अशी विरोधाभासी प्रतिमा सिनेमात दिसते.

संस्कृत साहित्य स्त्रीला प्रामुख्याने 'Subject' म्हणून सादर करते, तर सिनेमा अनेकदा तिला 'Object of Gaze' म्हणून मांडतो. तथापि, समकालीन हिंदी सिनेमामध्ये स्त्रीच्या आत्मसन्मानाचा, निर्णयक्षमतेचा आणि सामाजिक संघर्षाचा अधिक ठळक आविष्कार दिसून येतो, जो काही अंशी संस्कृत साहित्यातील स्त्रीप्रतिमेशी

साधर्म्य दर्शवतो.संस्कृत साहित्यामध्ये स्त्री बौद्धिक, नैतिक व आध्यात्मिक शक्तीचे केंद्र आहे.
वैदिक व उपनिषदकालीन स्त्रीला ज्ञानप्राप्ती व तत्त्वचिंतनाचा अधिकार होता.महाकाव्ये व नाटके स्त्रीला निर्णयक्षम, स्वाभिमानी व कर्तृत्ववान रूपात सादर करतात.संस्कृत साहित्यातील शृंगारिक वर्णन सूचक, कलात्मक व रसप्रधान आहे; अश्लील नाही.हिंदी सिनेमात स्त्रीप्रतिमा अनेकदा व्यावसायिक गरजांमुळे वस्तूकरणाकडे झुकलेली दिसते.आधुनिक सिनेमात स्त्री-सशक्तीकरणाची जाणीव वाढत असून स्त्रीकेंद्री कथानके उदयास येत आहेत.‘मृच्छकटिकम्’ आणि ‘उत्सव’ यांची तुलना दाखवते की माध्यम बदलले की स्त्रीप्रतिमेचा अर्थही बदलतो.

संस्कृत साहित्य अनेक बाबतीत आधुनिक सिनेमापेक्षा अधिक प्रगत व समतोल आहे.संस्कृत साहित्य स्त्रीला तिच्या विचार, नैतिकता व आत्मनिर्णयाच्या आधारावर गौरवते, तर सिनेमा अजूनही अनेकदा स्त्रीला दृश्यप्रधान चौकटीत अडकवतो.तथापि, बदलत्या सामाजिक जाणीवेमुळे आधुनिक सिनेमा हळूहळू संस्कृत परंपरेतील सशक्त स्त्रीप्रतिमेकडे पुन्हा वळताना दिसतो, ही बाब सकारात्मक मानली पाहिजे.

संदर्भ ग्रंथ व स्रोत-

१)डॉ. आ.ह साळुंखे, ‘हिंदू संस्कृती आणि स्त्री’, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई. १९९३
२)मुळे रवींद्र, ‘वेद दर्शन’, श्री संत वेद विद्या प्रतिष्ठान प्रकाशन ,औरंगाबाद. २००३
३)देशमुख पी., ‘वैदिक साहित्यात धर्माचा उगम आणि विकास’, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, २००१.
४)वाटवे केशव नारायण, ‘संस्कृत साहित्याचे पंचप्राण’ ,मनोहर ग्रंथमाला पुणे, १९७०.
५)भट गो.के. , ‘संस्कृत नाटके आणि नाटककार’, श्री विद्या प्रकाशन पुणे, १९८०.
६) कंगले र .प.,‘ कालिदासाची नाटके’, पॉप्युलर बुक प्रकाशन, मुंबई. १९५३
७) सोमन कृष्णाजी लक्ष्मण, ‘भासाची नाटके,’ शंकर नरहर जोशी प्रकाशन, पुणे, १९२७.
८)माने ना. त्रे., ‘मृच्छकटिकम्’, जी. पी. परचुरे प्रकाशन, मुंबई. १९७१
९) शर्मा श्रीराम,‘स्कंध पुराण’, संस्कृती प्रकाशन बरेली, १९८८ .
१०)किर्दत गोरखनाथ, ‘मार्कंडेय पुराण के साहित्य में ग्रामीण जीवन’, ए. बी. एस. पब्लिकेशन, वाराणसी. २०१३.
११)पांडे सुरुची, ‘संस्कृत साहित्याचा इतिहास रामायण महाभारत आणि पुराणे’, ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, पुणे. २००१
१२) हिराचंद लालचंद ,‘वाल्मीकि रामायण’, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. १९८७
१३) केळकर भालबा, ‘संपूर्ण महाभारत’, वरदा बुक्स प्रकाशन पुणे. १९८६
१४) भवभूती, शर्मा शेषराज मालवीय सुधाकर ‘उत्तररामचरीतम्’, २००१.
१५) भट्टनारायण, वाळींबे रामचंद्र शंकर,‘ वेणीसंहार’ लोखंडे प्रकाशन पुणे. १९६२
१६) सिंह पर्णदत्त, ‘याज्ञवलक्यस्मृती’, चौखंबा प्रकाशन, वाराणसी. २००९
१७) शर्मा गी. गो., ‘मनुस्मृति’ चौखंबा प्रकाशन वाराणसी, २००५.
१८)गद्रे राणा, ‘रत्नावली’ प्रकाशन पुणे, १९५४
१९)त्रिपाठी ब्रम्हानंद,‘कालिदास ग्रंथावली’, चौखंबा सूर्य भारती प्रकाशन, वाराणसी २००८
२०)‘शाकुंतलम्’ (२०२३) - चित्रपट समीक्षा
२१)रावण (२०१०) – हिंदी चित्रपट समीक्षा
२२)Utsav (१९८४) – हिंदी चित्रपट समीक्षा
२३)सिमोन द बोव्हुआर, अनुवादक करुणा गोखले ‘ द सेकंड सेक्स’,पद्मगन्धा प्रकाशन,पुणे२०१०.